0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**
१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.११/११/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८१/२०११/जा.९१२, दि. ११/११/२०११ व १६/११/२०११, २३/११/२०११.
३) मे. कारगिल इंडिया लिमिटेड यांचे दि. १४/११/२०११ रोजीचे निवेदन.
४) मे. कारगिल इंडिया लिमिटेड यांचे दि. २२/११/२०११ रोजीचे निवेदन.
५) मे. शिवम मार्केटिंग यांचे दि.२२/११/२०११ रोजीचे निवेदन.
६) मे. कारगिल इंडिया लिमिटेड यांचे दि. २५/११/२०११ रोजीचे निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८१/२०११/जा.१०४२
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : २९/१२/२०११.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अवये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक १०/११/२०११ रोजी या कार्यालयातील उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी त्यांचे पथक व पंचांसमवेत मे. शिवम मार्केटिंग, गोडावून क्र. जे ३६, ३७, ३८, एपीएमसी मार्केट -१, फेज-२, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई या ठिकाणी सकाळी १०:३० वाजता भेट देवून चौकशी व तपासणी केली असता, गोदामामध्ये मे. कारगिल इंडिया लिमिटेड या कंपनीचे जेमिनी, स्वीकार व नेचर फेस हे ब्रॅंड असलेले विविध खाद्यतेलाची साठवणूक करुन विक्री केली जाते, असे आढळून आले. पथकाने पंचांसमवेत संदर गोदामात प्रवेश करुन उपस्थित व्यक्तीस त्याचे नांव गांव विचारले असता त्याने त्याचे नांव संतोष रामदास टेकवडे असे सांगून ते गेल्या दोन वर्षापासून क्लिअरींग व फॉरवर्डीगचे एजन्ट व शिवम मार्केटिंगचे बिलींग मॅनेजर म्हणून काम करीत असल्याचे सांगितले. तसेच मे. शिवम मार्केटिंगचे हेमंत गणपत टाकळकर हे डेपो इन्चार्ज म्हणून गेले ३ वर्षापासून काम करीत असल्याचे सांगितले. संतोष रामदास टेकवडे व हेमंत गणपत टाकळकर यांचेकडे नियंत्रक शिधावाटप कार्यालयाकडून खाद्यतेला बाबतचा परवाना असल्याबाबत विचारणा केली असता, त्याने असा परवाना या कंपनीने प्राप्त करुन घेतला नसल्याचे सांगितले. तथापी, अन्न औषध प्रशासन, कृषी उत्पन्न बाजार समिती व गुमास्ता परवाना असल्याचे

सांगून सदर परवानाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिल्या. तद्नंतर अधिकाऱ्यांनी संतोष रामदास टेकवडे व हेमंत गणपत टाकळकर तसेच पंचासमक्ष प्रत्यक्ष खाद्यतेलाच्या साठ्याची मोजदाद केली असता, गोदामामध्ये ८७,१२६ कि.ग्रॅ. खादयतेल/वनस्पती यांचा साठा आढळून आला.

उपरोक्त नमुद विनापरवाना साठवणूक केलेल्या खादयतेलाचा साठा, दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ चे कलम २(Z)(IV)(VI), ३, ४, १० चा तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चा भंग केला असल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आल्यामुळे उपस्थित अधिकाऱ्यांनी दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ चे कलम १५(सी) अन्वये सदरचा संपुर्ण खादयतेलाचा विनापरवाना/अनधिकृत असलेला साठा पंचासमक्ष जागीच सिलबंद करुन जप्त करण्यात आला. सदर जप्त केलेल्या खादयतेलाच्या साठयाचा सुपूर्दनामा करुन संतोष रामदास टेकवडे यांच्या ताब्यात देवून पुढील आदेशापर्यंत सदरचा साठा जतन करण्याच्या सुचना देवून उपरोक्त बाबत घटनास्थळी पंचनामा करण्यात आला तसेच मे. कारगिल इंडिया लिमिटेड या कंपनीचे काम पाहाणारे क्लिअरींग व फॉरवर्डीगचे एजन्ट व शिवम मार्केटिंगचे बिलींग मॅनेजर संतोष रामदास टेकवडे व मे. शिवम मार्केटिंगचे हेमंत गणपत टाकळकर हे डेपो इन्चार्ज यांचा लेखी जबाब नोंदविण्यात येवून सुपूर्दनामा करण्यात आला.

अशाप्रकारे मे. शिवम मार्केटिंग, गोडावून क्र. जे ३६, ३७, ३८ एपीएमसी मार्केट -१, फेज-२, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई येथील गोदामामध्ये मे. कारगिल इंडिया लिमिटेड या कंपनीने यांनी मोठया प्रमाणात साठवणूक केलेल्या खादयतेल/वनस्पती या जीवनावश्यक वस्तुंचा साठा हा साठेबाजी करण्याच्या उद्देशाने तसेच विनापरवाना असल्याचे सकृतदर्शनी दिसुन आल्याने तसेच दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ व पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ मधील तरतुदींचा भंग केल्याचे निदर्शनास आल्याने अधिकाऱ्यांनी पुढील तपासणीचे अधिन राहुन उपरोक्त नमुद खादयतेल/वनस्पती चा ८७,१२६ कि.ग्रॅ. साठा घटनास्थळीच जप्त करुन सुपूर्दनामा करण्यात आलेला आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी वरील वाचावे क्र.१ मध्ये नमूद केलेल्या अहवालान्वये केली आहे. त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला जीवनावश्यक वस्तुंचा साठा सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. १४/११/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १४/११/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. कारगिल इंडिया लिमिटेड या कंपनीच्या वतीने श्री. प्रदिप विष्णोई, रिजनल कमर्शियल मॅनेजर व श्री. सचिन मल्होत्रा, रिजनल सप्लाय चेन मॅनेजर हे उपस्थित राहीले व त्यांनी

वाचावे क्र. ३ अन्वये कंपनीचे लेखी निवेदन सादर केले व त्यासोबत नमूद गोदामावरील व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र, अन्न व औषध प्रशासन, नवी मुंबई मनपा तसेच मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती या आस्थापनांकडून खाद्यतल/वनस्पती व्यापारी म्हणून साठवणूक व विक्री करण्याचा परवाना सादर केला. तथापी, या विभागाकडील साठवणूक व विक्री करिताचा नमूद गोदामावरील घाऊक परवाना घेतला नसल्याचे सांगून त्यांनी उत्पनादच्या ठिकाणी मिलर म्हणून परवाना घेतला आहे किंवा कसे ? याबाबत तसेच मे शिवम मार्केटिंग यांच्या गोडावूनमध्ये खाद्यतेलाचा साठा जप्त करण्यात आला असल्याने याबाबत संबधितांकडून खुलासा होणे आवश्यक आहे. संबब, पुढील सुनावणी दिनांक २२/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २२/११/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. कारगिल इंडिया लिमिटेड या कंपनीच्या वतीने श्री. प्रदिप विष्णोई, रिजनल कमर्शियल मॅनेजर व श्री. सचिन मल्होत्रा, रिजनल सप्लाय चेन मॅनेजर हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ४ अन्वये कंपनीचे लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस मे. शिवम मार्केटिंग कंपनीचे मालक श्री. अविनाश तुकाराम फलके हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र.५ अन्वये कंपनीचे लेखी निवेदन सादर केले. तसेच इतर दस्ताऐवज सादर करण्याकरिता सुनावणीची पुढील तारीख मिळण्याची विनंती केली. संबब, अंतीम सुनावणी दिनांक २५/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २५/११/२०११ रोजीच्या अंतीम सुनावणीस मे. कारगील इंडिया प्रा.लि. चे श्री. प्रदिप विष्णोई, रिजनल कमर्शियल मॅनेजर व श्री. अय्याज पटेल, मार्केट लॉजिस्टीक कोऑरडिनेटर हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ६ अन्वये कंपनीचे लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस मे. शिवम मार्केटिंग कंपनीचे मालक श्री. अविनाश तुकाराम फलके हे उपस्थित राहिले.

संबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले.

युक्तिवाद :-

दि.१४/११/२०११ रोजी सुनावणी मे. कारगिल इंडिया प्रा.लि. च्या वतीने उपस्थित श्री. प्रदिप विष्णोई, रिजनल कमर्शियल मॅनेजर व श्री. सचिन मल्होत्रा, रिजनल सप्लाय चेन मॅनेजर यांनी कंपनीच्या वतीने सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये, ते खाद्यतेलाचे उत्पादक असून सदर कंपनीचे खाद्यतेल/वनस्पतीचा उत्पादित साठा राष्ट्रीय स्तरावर वितरण व विक्री केले जात असून त्यांचे पराधीप (ओरीसा), कांडला (गुजरात) व कुरकुंभ (पुणे) येथे उत्पादित केले जात असून सर्वांची एकत्रित उत्पादन क्षमता १,७७०,७५० मे. टन आहे. याव्यतिरिक्त ते खाद्यतेल व वनस्पतीचा साठा त्रयस्त कंपनीकडूनही उत्पादित करुन घेत असल्याचे सांगितले. तद्नंतर सदरचा साठा ते क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग एजन्ट मार्फत विविध ठिकाणी वितरण करीत असून त्यापैकी एक ठिकाण वाशी हे आहे.

तथापी, ते खाद्यतेलाचे उत्पादक असल्याने त्यांना दि महाराष्ट्र होलसेल ऑर्डर १९९८ लागू होत नसल्याचे नमूद केले आहे. सदर आदेशामध्ये नमूद केलेले डिलरच्या व्याख्येमध्ये उत्पादक हे शब्द नसल्याने उत्पादकांना या आदेशामधून वगळण्यात आले असून सदर आदेशामधील विहित केलेले साठवणूकीचे कमाल मर्यादा उत्पादन कंपन्यांना लागू होत नसल्याचे नमूद केले आहे.

दि.२२/११/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. शिवम मार्केटिंग कंपनीचे मालक श्री. अविनाश तुकाराम फलके यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये, दि.१०/११/२०११ रोजी अधिकाऱ्यांनी नमूद पत्त्यावर भेट देऊन शिधावाटप कार्यालयाचा परवाना मागितला. परंतू सदरचे गोदाम हे मे. कारगील इंडिया प्रा.लि. या कंपनीने भाडेतत्त्वावर घेतले असून त्याचे शिवम मार्केटिंग हे क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग एजन्टचे काम करीत आहे. सदर गोदामामधील साठ्याचा, विक्रीचा, हिशोबाचा व इतर आर्थिक व्यवहाराशी त्यांचा (शिवम मार्केटिंगचा) काहीही संबंध नाही. संतोष रामदास टेकवडे व हेमंत गणपत टाकळकर हे दोन्ही कर्मचारी शिवम मार्केटिंग येथे काम करीत असून त्यांना शिवम मार्केटिंग तर्फे पगार दिला जातो. तसेच त्यांच्यातर्फे कारगील इंडिया प्रा.लि. या कंपनीच्या गोडावूनमधील खाद्यतेलाच्या साठ्याबाबत कोणताही आर्थिक व्यवहार केला जात नाही, असे नमूद केले आहे.

दि.२२/११/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. कारगील इंडिया प्रा.लि. चे श्री. प्रदिप विष्णोई, रिजनल कमर्शियल मॅनेजर व श्री. सचिन मल्होत्रा, रिजनल सप्लाय चेन मॅनेजर यांनी कंपनीच्या सादर केलेल्या लेखी निवेदनात, त्यांच्या कंपनीकडे असलेले विविध परवान्यांचे मुळ प्रती दि.१४/११/२०११ रोजीच्या सुनावणीस सादर करण्यात आले असून ते स्वतः उत्पादक असल्याने त्यांना घाऊक विक्रेता (होलसेलर) म्हणून संबोधण्यात येऊ नये असे सांगून इतर दस्ताऐवज सादर करण्याकरिता सुनावणीची पुढील तारीख मिळण्याची विनंती केल्याचे नमूद केले.

दि.२५/११/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. कारगील इंडिया प्रा.लि. चे श्री. प्रदिप विष्णोई, रिजनल कमर्शियल मॅनेजर व श्री. अय्याज पटेल, मार्केट लॉजिस्टीक कोऑरडिनेटर यांनी कंपनीच्या वतीने सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये, दि.२२/११/२०११ रोजीच्या सुनावणीमध्ये निर्देशित केल्यानुसार त्यांच्या उत्पादनाच्या ठिकाणी असलेले विविध परवान्यांचे छायांकित प्रती सादर केल्या आहेत. १) डेप्युटी डायरेक्टर - वेजीटेबल ऑईल प्रोडक्टस् कमिशनर, भारत सरकार यांचेकडून निर्गमित नोंदणी प्रमाणपत्र. २) महाराष्ट्र राज्याचे वॅट बाबतचे नोंदणी प्रमाणपत्र. ३) नागरी पुरवठा मंत्रालय, नवी दिल्ली या विभागाकडून अनुज्ञप्ती क्र. आरयु/इडिबल/६७० दिनांक ०७/०३/१९९५. ४) अन्न व औषध प्रशासन विभागाकडून पुणे येथील उत्पादनाच्या ठिकाणी उत्पादन, पॅकींग, विक्री, साठवणूक व वितरण या करिता खाद्यतेल/वनस्पती करिता देण्यात आलेला परवाना. ५) सहाय्यक आयुक्त, केंद्रीय उत्पादन शुल्क या विभागाकडून प्राप्त परवाना. ६) अन्न, नागरी व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, भारत सरकार या विभागाच्या अधिपत्त्याखालील साखर व खाद्यतेल या प्राधिकरणाकडून प्राप्त परवाना. सदर व्यवसायास

आवश्यक असणारे विविध परवाने त्यांनी रितसर अर्ज करुन त्यांच्या उत्पादनाच्या पत्त्यावर प्राप्त करुन घेतले असून त्यांची कंपनी उत्पादक असल्याने त्यांना खरेदी, विक्री व साठवणूकीकरिता परवान्याचे गरज नसल्याचे नमूद करुन त्यांनी दि महाराष्ट्र होलसेल डिलर लायसन्सींग ऑर्डर १९९८ चे भंग केले नसल्याचे नमूद केले आहे.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी, साठा मालक याचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक १०/११/२०११ रोजी या कार्यालयातील उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी त्यांचे पथक व पंचासमवेत मे. शिवम मार्केटिंग, गोडावून क्र. जे ३६, ३७, ३८, एपीएमसी मार्केट -१, फेज-२, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई या ठिकाणी सकाळी १०:३० वाजता भेट देवून चौकशी व तपासणी केली असता, गोदामामध्ये मे. कारगिल इंडिया लिमिटेड या कंपनीचे जेमिनी, स्वीकार व नेचर फेस हे ब्रँड असलेले विविध खाद्यतेलाची साठवणूक करुन विक्री केली जाते, असे आढळून आल्याने पथकाने पंचासमवेत सदर गोदामात प्रवेश करुन उपस्थित व्यक्तीस त्याचे नांव गांव विचारले असता त्याने त्याचे नांव संतोष रामदास टेकवडे असे सांगून ते गेल्या दोन वर्षापासून क्लिअरींग व फॉरवर्डींगचे एजन्ट व शिवम मार्केटिंगचे बिलींग मॅनेजर म्हणून काम करीत असल्याचे सांगितले. तसेच मे. शिवम मार्केटिंगचे हेमंत गणपत टाकळकर हे डेपो इन्चार्ज म्हणून गेले ३ वर्षापासून काम करीत असल्याचे सांगितले. संतोष रामदास टेकवडे व हेमंत गणपत टाकळकर यांचेकडे नियंत्रक शिधावाटप कार्यालयाकडून खाद्यतेलाबाबतचा परवाना असल्याबाबत विचारणा केली असता, त्याने असा परवाना या कंपनीने प्राप्त करुन घेतला नसल्याचे सांगितले. तथापी, अन्न औषध प्रशासन, कृषी उत्पन्न बाजार समिती व गुमास्ता परवाना असल्याचे सांगून सदर परवानाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिल्या. तद्नंतर अधिकाऱ्यांनी संतोष रामदास टेकवडे व हेमंत गणपत टाकळकर तसेच पंचासमक्ष प्रत्यक्ष खाद्यतेलाच्या साठ्याची मोजदाद केली असता, गोदामामध्ये ८७,१२६ कि.ग्रॅ. खादयतेल/वनस्पती यांचा साठा आढळून आला.

उपरोक्त नमुद विनापरवाना साठवणूक केलेल्या खादयतेलाचा साठा, दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ चे कलम २(Z)(IV)(VI), ३, ४, १० चा तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चा भंग केला असल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आल्यामुळे उपस्थित अधिकाऱ्यांनी दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ चे कलम १५(सी) अन्वये सदरचा संपुर्ण खादयतेलाचा विनापरवाना/अनधिकृत असलेला साठा पंचासमक्ष जागीच सिलबंद करुन जप्त करण्यात आला. सदर जप्त केलेल्या खादयतेलाच्या

साठयाचा सुपूर्दनामा करुन संतोष रामदास टेकवडे यांच्या ताब्यात देवून पुढील आदेशापर्यंत सदरचा साठा जतन करण्याच्या सुचना देवून तसा मे. कारगिल इंडिया लिमिटेड या कंपनीचे काम पाहाणारे क्लिअरींग व फॉर्वडींगचे एजन्ट व शिवम मार्केटिंगचे बिलींग मॅनेजर संतोष रामदास टेकवडे व मे. शिवम मार्केटिंगचे हेमंत गणपत टाकळकर हे डेपो इन्चार्ज यांचा लेखी जबाब नोंदविण्यात आला.

अशाप्रकारे मे. शिवम मार्केटिंग, गोडावून क्र. जे ३६, ३७, ३८ एपीएमसी मार्केट -१, फेज-२, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई येथील गोदामामध्ये मे. कारगिल इंडिया लिमिटेड या कंपनीने यांनी मोठया प्रमाणात साठवणूक केलेल्या खादयतेल/वनस्पती या जीवनावश्यक वस्तुचा साठा हा साठेबाजी करण्याच्या उद्देशाने तसेच विनापरवाना असल्याचे सकृतदर्शनी दिसुन आल्याने तसेच दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ व पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ मधील तरतुदींचा भंग केल्याचे निदर्शनास आल्याने अधिकाऱ्यांनी पुढील तपासणीचे अधिन राहुन उपरोक्त नमुद खादयतेल/वनस्पतीचा ८७,१२६ कि.ग्रॅ. साठा घटनास्थळीच जप्त करुन सुपूर्दनामा करण्यात आलेला आहे.

श्री. प्रदिप विष्णोई, रिजनल कमर्शियल मॅनेजर व श्री. सचिन मल्होत्रा, रिजनल सप्लाय चेन मॅनेजर यांनी मे. कारगिल इंडिया प्रा.लि. या कंपनीच्या वतीने सादर केलेल्या खुलाशात, ते खाद्यतेलाचे उत्पादक असून सदर कंपनीचे खाद्यतेल/वनस्पतीचा उत्पादित साठा राष्ट्रीय स्तरावर वितरण व विक्री केले जात असून त्याचे पराधीप (ओरीसा), कांडला (गुजरात) व कुरकुंभ (पुणे) येथे उत्पादित केले जात असून सर्वांची एकत्रित उत्पादन क्षमता १,७७०,७५० मे. टन आहे. याव्यतिरिक्त ते खाद्यतेल व वनस्पतीचा साठा त्रयस्त कंपनीकडूनही उत्पादित करुन घेत असल्याचे सांगितले. तद्नंतर सदरचा साठा ते क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग एजन्ट मार्फत विविध ठिकाणी वितरण करीत असून त्यापैकी एक ठिकाण वाशी हे आहे. तथापी, ते खाद्यतेलाचे उत्पादक असल्याने त्यांना दि महाराष्ट्र होलसेल ऑर्डर १९९८ लागू होत नसल्याचे नमूद केले आहे. सदर आदेशामध्ये नमूद केलेले डिलरच्या व्याख्येमध्ये उत्पादक हे शब्द नसल्याने उत्पादकांना या आदेशामधून वगळण्यात आले असून सदर आदेशामधील विहित केलेले साठवणूकीचे कमाल मर्यादा उत्पादन कंपन्यांना लागू होत नसल्याचे नमूद केले आहे. त्याच्या कंपनीकडे असलेले विविध परवान्यांचे मुळ प्रती दि.१४/११/२०११ रोजीच्या सुनावणीस सादर करण्यात आले असून ते स्वतः उत्पादक असल्याने त्यांना घाऊक विक्रेता (होलसेलर) म्हणून संबोधण्यात येऊ नये असे सांगून त्यांनी त्यांच्या उत्पादनाच्या ठिकाणी असलेले विविध परवान्यांचे छायांकित प्रती सादर केल्या आहेत. १) डेप्युटी डायरेक्टर - वेजीटेबल ऑईल प्रोडक्टस् कमिशनर, भारत सरकार यांचेकडून निर्गमित नोंदणी प्रमाणपत्र. २) महाराष्ट्र राज्याचे वॅट बाबतचे नोंदणी प्रमाणपत्र. ३) नागरी पुरवठा मंत्रालय, नवी दिल्ली या विभागाकडून अनुज्ञप्ती क्र. आरयु/इडिबल/६७० दि.०७/०३/१९९५. ४) अन्न व औषध प्रशासन विभागाकडून पुणे येथील उत्पादनाच्या ठिकाणी उत्पादन, पॅकींग,

विक्री, साठवणूक व वितरण या करिता खाद्यतेल/वनस्पती करिता देण्यात आलेला परवाना. ५) सहाय्यक आयुक्त, केंद्रीय उत्पादन शुल्क या विभागाकडून प्राप्त परवाना. ६) अन्न, नागरी व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, भारत सरकार या विभागाच्या अधिपत्त्याखालील साखर व खाद्यतेल या प्राधिकरणाकडून प्राप्त परवाना. सदर व्यवसायास आवश्यक असणारे विविध परवाने त्यांनी रितसर अर्ज करुन त्यांच्या उत्पादनाच्या पत्त्यावर प्राप्त करुन घेतले असून त्यांची कंपनी उत्पादक असल्याने त्यांना खरेदी, विक्री व साठवणूकीकरिता परवान्याचे गरज नसल्याचे नमूद करुन त्यांनी दि महाराष्ट्र होलसेल डिलर लायसन्सीग ऑर्डर १९९८ चे भंग केले नसल्याचे नमूद केले आहे.

मे. शिवम मार्केटिंग कंपनीचे मालक श्री. अविनाश तुकाराम फलके यांनी केलेल्या खुलाशात, दि.१०/११/२०११ रोजी अधिकाऱ्यांनी नमूद पत्त्यावर भेट देऊन शिधावाटप कार्यालयाचा परवाना मागितला. परतू सदरचे गोदाम हे मे. कारगील इंडिया प्रा.लि. या कंपनीने भाडेतत्त्वावर घेतले असून त्यांचे शिवम मार्केटिंग हे क्लिअरिंग अॅण्ड फॉरवर्डिंग एजन्टचे काम करीत आहे. सदर गोदामामधील साठ्याचा, विक्रीचा, हिशोबाचा व इतर आर्थिक व्यवहाराशी त्यांचा (शिवम मार्केटिंगचा) काहीही संबध नाही. संतोष रामदास टेकवडे व हेमंत गणपत ताकडकर हे दोन्ही कर्मचारी शिवम मार्केटिंग येथे काम करीत असून त्यांना शिवम मार्केटिक तर्फे पगार दिला जातो. तसेच त्यांच्यातर्फे कारगील इंडिया प्रा.लि. या कंपनीच्या गोडावूनमधील खाद्यतेलाच्या साठ्याबाबत कोणताही आर्थिक व्यवहार केला जात नाही, असे नमूद केले आहे.

तथापी, केंद्रशासनाचे, ग्राहक बाबी, अन्न व सार्वजनीक वितरण मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्र. २२२७(अ) दिनांक २७/०९/२०११ अन्वये खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या व्यापारावर दिनांक ३०/९/२०१२ पर्यंत निर्बंध आणलेले आहेत.

दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसन्सीग ऑर्डर १९९८ अन्वये तांदूळ, डाळी/कडधान्य, खाद्यतेल/वनस्पती, खाद्यतेल बिया यांचा व्यवसाय करण्याऱ्या व्यापाऱ्यांना परवाना घेणे क्रमप्राप्त आहे. ग्राहक संरक्षण, अन्न व नागरी पुरवठा, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि.१६/०६/२००३ रोजी पारीत केलेले आदेश क्र. जीएसआर/४९०(ई) अन्वये डिलरची व्याख्या " Dealer means any person engaged in the business of purchase, movement, sale, supply, distribution or storage for sale of any of the commodities specified in clause ३ whether as a wholesaler or retailer or producer or manufacturer or exporter or importer and whether or not in conjunction with any other business and includes his representative or agent but does not include a producer or manufacturer or importer or exporter of sugar." म्हणजेच डिलरच्या नमूद केलेल्या व्याख्येमध्ये साखरेचे उत्पादक,

आयातदार / निर्यातदार वगळता इतर सर्वांना डिलर म्हणून संबोधण्यात आल्याने त्यांना दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायन्ससिंग ऑर्डर, १९९८ अन्वये परवाना घेणे क्रमप्राप्त आहे.

मे. कारगील इंडिया प्रा.लि. यांनी त्यांच्या कंपनीच्या नावे विविध आस्थापनांकडून खाद्यतेलाच्या खरेदी, विक्री व साठवणूकीकरिता परवाने प्राप्त करुन घेतले आहे. १) नवी मुंबई महानगर पालिका यांचेकडून सर्व प्रकारचे खाद्यतेल, वनस्पती साठवणूक व विक्री करिता गुमास्ता परवाना क्र. ००७२११७ हे प्राप्त करुन घेतल्याचे आढळून आले. २) अन्न व औषध प्रशासन विभाग, जिल्हा ठाणे यांचेकडून एस/एन.एम/आर-डब्ल्यु/५१८/कॉम-१४१५/२००८ अन्वये खाद्यतेल, वनस्पती साठवणूक व विक्री इत्यादी साठी अनुज्ञप्ती मे. कारगिल इंडिया लिमिटेड या नावे प्राप्त करुन घेतल्याचे आढळून आले. ३) मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती यांचेकडून व्यापारी, अडत्या किंवा दलाल म्हणून काम करण्यासाठी व्यापारी म्हणून मे. कारगिल इंडिया लिमिटेड या नावे नमुना एक मधील परवाना घेतल्याचे आढळून आले. ४) नवी मुंबई महानगर पालिका, उपकर विभाग यांचेकडून मे. कारगिल इंडिया लिमिटेड यांच्या नावे खाद्यतेलाचे घाऊक विक्रेता म्हणून नोंदणी क्र. एन.एम.एम.सी./सी ई जी/ ११/००८७० अन्वये नोंदणी प्रमाणपत्र घेतल्याचे आढळून आले.

तथापी, या विभागाकडून दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९९८ अन्वये खाद्यतेलाचे मिलर्स (ऑईल मिल) करीता आवश्यक असणारा परवाना मे. कारगील इंडिया प्रा.लि., एम.आय.डी.सी. एरिया, कुरकुंभ, तालुका दौंड, जिल्हा पुणे यांनी त्यांच्या उत्पादनाच्या ठिकाणी घेतला आहे किंवा कसे ? याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/फिप/ २०११/जा.१८४ दि.१५/११/२०११ अन्वये, जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे यांना विचारणा केली असता, मे कारगिल इंडिया प्रा.लि. यांनी त्यांचे उत्पादनाच्या ठिकाणी मिलर परवाना मिळण्यासाठी दि.१६/०५/२००८ रोजी अर्ज केला होता. त्यावर कंपनीस तहसिलदार, दौंड यांनी अपूर्ण कागदपत्रांची पुर्तता करण्याबाबत दि.२९/०७/२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. त्यानंतर कंपनीने दि.०४/१२/२०१० रोजी परवाना मिळणेसाठी तहसिलदार, दौंड यांचेकडे पुन्हा अर्ज केला असता, अर्जासोबत कोणतेही कागदपत्र सादर न केल्याने तहसिलदार, दौंड यांनी मे. कारगील इंडिया प्रा.लि. यांचा नविन परवानाचा अर्ज दि.२६/०८/२०११ रोजीच्या पत्रान्वये निकाली काढण्यात आल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे यांनी त्यांच्या दि.०५/१२/२०११ रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे.

तथापी, जप्त करण्यात आलेला खाद्यतेलाचा साठा हा उत्पादनाच्या ठिकाणी नसुन तो वाशी येथील नमुद गोदामात साठवणूकीचे ठिकाणी आढळून आला आहे. दि महाराष्ट्र होलसेल डिलर लायसन्सींग ऑर्डर १९९८ चे कलम ३ अन्वये खाद्यतेल/वनस्पतीच्या खरेदी, विक्री व साठवणूकीकरिता नमुद गोदामावर आवश्यक असणारा घाऊक परवाना त्यांनी घेतला नसल्याचे तसेच त्याकरिता संबंधित प्राधिकरणाकडे अर्जही केला नसल्याचे आढळून

आल्याने सदरचा जप्त करण्यात आलेला ८७,१२६ किलो ग्रॅम म्हणजेच ८७१.२६ क्विंटल खाद्यतेलाचा साठा हा विनापरवाना साठवणूक केल्याचे निष्पन्न होत आहे.

सबब, मे. कारगील इंडिया प्रा.लि. यांनी गोडावून क्र. जे ३६, ३७, ३८ एपीएमसी मार्केट -१, फेज-२, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई या नमुद गोदामावर दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९९८ चे कलम ३ अन्वये साठवणूकीचा परवाना नसल्याने तसेच जप्त खाद्यतेल/वनस्पतीचा साठा हा विनापरवाना साठवणूक केल्याने त्यांनी दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९९८ चे कलम ३ तसेच जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३, ७, ८ व १० चा भंग केल्याचे निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने, मे. कारगील इंडिया प्रा.लि. यांचेविरुध्द ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, वाशी, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्रमांक ३०८५/२०११ दिनांक १५/१२/२०११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सबब, मे. कारगिल इंडिया प्रा. लि. यांनी त्यांचे गोडावून क्र. जे ३६, ३७, ३८ एपीएमसी मार्केट -१, फेज-२, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई येथे साठवणूक केलेल्या खाद्यतेल या जीवनावश्यक वस्तुंचा विनापरवाना साठवणूक केलेला खाद्यतेलाचा एकुण ८७१.२६ क्विंटल साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्रमांक ३०८५/२०११ दिनांक १५/१२/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES

## आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी मे. कारगिल इंडिया प्रा. लि. यांचे गोडावून क्र. जे ३६, ३७, ३८ एपीएमसी मार्केट -१, फेज-२, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई या पत्त्यावरील गोदामामधील जप्त करण्यात आलेला ८७१.२६ क्विंटल खाद्यतेलाचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण खाद्यतेलाचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

मे. कारगिल इंडिया प्रा.लि.,
गोडावून क्र. जे ३६, ३७, ३८, एपीएमसी मार्केट -१,
फेज-२, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच जप्त करण्यात आलेले खाद्यतेलचा साठा हा नाशवंत असल्याने आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, फ-परिमंडळ यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की, आदेशाप्रमाणे जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीचे कार्यवाही करण्याकरिता पोलिसांना आवश्यक ती मदत करावी.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.

५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.